क्र.२/नसवि/प्रशासक/०९/२०२४-२०२५
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका
दिनांक :- ०६ सप्टेंबर २०२४

# सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

## प्रशासक सभा क्रमांक - ०९/२०२४-२०२५

## स्थायी समिती सभा कामकाजाकरिता प्रशासक सभेची नोटीस

ज्या अर्थी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदीनुसार विविध कामकाज पार पाडण्यासाठी प्रस्तावित प्रस्तांवाना स्थायी समितीची पुर्व मान्यता देणे आवश्यक आहे आणि,

ज्या अर्थी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील कलम ६, ६(अ) मधील तरतुदीनुसार सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका नगरमंडळाची मुदत दि.१९ ऑगस्ट २०२३ रोजी संपुष्टात आलेली असल्याने सद्य:स्थितीत स्थायी समिती अस्तित्वात नाही, आणि,

ज्या अर्थी, महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमाखाली सर्व अधिकारांचा वापर करण्यासाठी आणि तिची सर्व कामे व कर्तव्ये पार पाडण्यासाठी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ (अ) मधील तरतुदीनुसार सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेच्या प्रशासक पदी आयुक्त,सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका यांची दि.२४/०८/२०२३ रोजीचे मा.शासन आदेशान्वये नियुक्ती करण्यात आलेली आहे.

त्या अर्थी, स्थायी समितीच्या मान्यतेने पार पाडावयाचे कामकाज पुर्ण करण्यासाठी प्रशासक यांच्या अध्यक्षतेखाली **सोमवार दि.०९/०९/२०२४ रोजी सकाळी ११.०० वाजता महानगरपालिका मंगलधाम कार्यालय, सांगली** येथे सभा आयोजित केली आहे. सदर सभेमध्ये खालील परिशिष्ठातील विषय विचाराधीन आहेत. तरी सदर सभेस सर्व संबंधीत अधिकारी यांनी उपस्थित रहावे.

## परिशिष्ठ

४२ ते ४७

४८ १. मागील स्थायी समिती प्रशासक सभा दि.०२/०९/२०२४ रोजीचे कार्यवृत्त वाचून कायम करणे.

४९ २. राष्ट्रीय नदी कृती योजना (NRAP) शेरीनाला व कवलापूर पंपींग स्टेशन येथे नव्याने ३०० व २०० अश्वशक्तीचे सबमर्सिबल पंप बसविणे अंदाजपत्रकीय र.रु.५९,५९,४३८/- मात्रचे कामी रितसर जाहिर निविदा मागविणेत आल्या होत्या. विहित मुदतीत प्राप्त निविदा मधील निविदाधारक सुवास इलेक्ट्रीकल,ठाणे यांचा दर एस्टीमेट दरापेक्षा १% कमी दर प्राप्त झालेने वाटाघाटीअंती त्यांनी १.५% कमी दराने कामगिरी करणेस सहमती दर्शविलेने निविदाधारक सुवास इलेक्ट्रीकल,ठाणे १.५% कमी दराने कामगिरी करुन घेणेस व त्याकामी येणारे र.रु.५८,७०,०४६/- मात्रचे खर्चास मान्यता देणेकामी **अतिरिक्त आयुक्त (जलनि:सारण विभाग) यांचे दि.०४/०९/२०२४ रोजीचे विषयपत्र.**

५० ३. जनरल फंडातून वेतन व अत्यावश्यक देयके अदा करणेकरीता मालमत्ता व अनामत या खाते अंतर्गत गुंतवणूक मुदतपूर्व मोडून सेव्हींग खातेवरती जमा करणेस त्याचप्रमाणे जनरल फंडातून गुंतवणुक मुदतपुर्व मोडून सेव्हींग खातेवरती जमा करणेस मान्यता देणेकामी **उपायुक्त (लेखा विभाग) यांचे दि.०६/०९/२०२४ रोजीचे विषयपत्र.**

५१ ४. श्री गणेशोत्सव २०२४ मध्ये महानगरपालिका कार्यक्षेत्रात मनपाने स्थापन केलेल्या मुर्तीदान केंद्रावरील व कृत्रिम कुंडामधील विसर्जित केलेल्या गणेश मुर्ती सुरक्षित स्थळी लावणेकरीता रितसर जाहिर निविदा मागविणेत आल्या होत्या. विहित मुदतीत प्राप्त तीन निविदा मधील सर्वात कमी दराचे निविदाधारक श्री.मिथुन बसु गोगीकर,सांगली यांचेकडून प्राप्त प्रतिवाहन प्रतितास र.रु.१६२५/- प्रमाणे १८ बंदीस्त आयशर टॅम्पो प्रतिवाहन ६ मन्युष्यबळासह भाडे तत्वावर घेऊन त्यांचेकडून कामगिरी करुन घेणेस व त्याकामी येणारे र.रु.३२,१७,५००/- मात्रचे खर्चास मान्यता देणेकामी **उपायुक्त मुख्यालय (घ.व्य.आरोग्य विभाग) यांचे दि.०९/०९/२०२४ रोजीचे विषयपत्र.**

५२ ५. मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेंतर्गत आयोजित महिला लाभार्थी मेळावा झालेल्या कार्यक्रमास (जेवण,भांडी, बैठक व्यवस्था,साऊंड,एल.ई.डी,स्क्रीन व माईक सिस्टीम,व्हिडीओ मिक्सर,व्हिडीओ मॉनिटर इ.) रितसर जाहिर निविदा प्रक्रिया राबविणेस पुरेसा कालावधी नसलेने व काम वेळेत पुर्ण होणेच्या दृष्टीने स्थानिक बाजारातून प्राप्त दरपत्रकातील सर्वात कमी दराचे विषयपत्रातील नमुद चार कामगिरी करीता प्राप्त पुरवठादाराकडून अत्यावश्यक व तातडीची बाब म्हणून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण ५ संविदा खंड २(२) चे परंतुकान्वये कामगिरी करुन घेणेत आलेल्या असून, त्यास व त्याकामी झालेल्या एकूण र.रु.६,७८,७००/- मात्रचे खर्चास मान्यता देणेकामी **अतिरिक्त आयुक्त (म.बा.वि. विभाग) यांचे दि.०९/०९/२०२४ रोजीचे विषयपत्र.**

५३ ६. सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका मुख्यालय व मंगलधाम कार्यालय,सांगली येथे दिव्यांगासाठी लिफ्ट बसविणे अंदाजपत्रकीय र.रु.४९,३३,०५२/- मात्रचे कामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण ५ संविदा खंड २ (१) अन्वये रितसर जाहिर निविदा www.mahatenders.gov.com या संकेत स्थळावर प्रसिद्ध करुन निविदा मागविणेस व त्याकामी येणारे खर्चास मान्यता देणेकामी **अतिरिक्त आयुक्त (विद्युत विभाग) यांचे दि.०६/०९/२०२४ रोजीचे विषयपत्र.**

**मा.प्रशासक तथा आयुक्तसो यांचे मान्यतेने**

**प्र.महापालिका सचिव,**
सांगली मिरज आणि कुपवाड शहर
महानगरपालिका

# सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

## स्थायी समिती प्रशासक सभा क्रमांक :- ०९/२०२४-२५ दिनांक :- ०९/०९/२०२४ चे इतिवृत्त

सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिकेची स्थायी समिती प्रशासक सभा क्र.०९ दि.०९/०९/२०२४ रोजी महानगरपालिका मंगलधाम कार्यालय,सांगली येथे सकाळी ११.०० वाजता आयोजित करणेत आलेली होती. सदर प्रशासक स्थायी समिती सभेकरीता खालील अधिकारी उपस्थित होते.

| अ.क्र. | उपस्थितांची नावे | अ.क्र. | उपस्थितांची नावे |
|---|---|---|---|
| १. | श्री.शुभम गुप्ता – प्रशासक | ११. | श्रीमती प्रज्ञा त्रिभुवन – सहा.आयुक्त,प्र.स.क्र.२ |
| २. | श्री.रविकांत आडसुळ – अतिरिक्त आयुक्त,मिरज | १२. | श्री.सचिन सागावकर - सहा.आयुक्त,प्र.स.क्र.३ |
| ३. | श्री.वैभव साबळे – उपायुक्त मालमत्ता व्यवस्थापन | १३. | श्री.अनिस मुल्ला- सहा.आयुक्त,प्र.स.क्र.४ |
| ४. | श्री.पृथ्वीराज चव्हाण –शहर अभियंता | १४. | श्री.धनंजय हर्षद – जनसंपर्क अधि./मालमत्ता अधिक्षक |
| ५. | श्री.अभिजीत मेंघडे - मुख्य लेखाधिकारी | १५. | श्री.नकुल जकाते – सिस्टिम मॅनेजर |
| ६. | श्री.रविंद्र ताटे – वैद्य.आरोग्य अधि. सार्व. आरोग्य | १६. | श्री.सुनिल माळी – मुख्य अग्निशमन अधिकारी |
| ७. | श्री.वैभव पाटील – वैद्य.आरोग्य अधि. वैद्य.सेवा | १७. | श्री.राजेंद्र काकडे – नगररचनाकार, सांगली |
| ८. | श्री.अशोक माणकापुरे – प्रशासकीय अधिकारी | १८. | श्री.समिर जमादार – विधी विभाग अधिकारी |
| ९. | श्री.विनायक शिंदे – प्रशासन अधिकारी (आस्थापना) | १९. | श्री.सुनिल पाटील – विशेष कार्यकारी अधिकारी |
| १०. | श्री.सहदेव कावडे– सहा.आयुक्त १/ नगरसचिव | | |

महापालिका सचिव यांनी सभेच्या सुरुवातीला मा.प्रशासक व सर्व अधिकारी यांचे स्वागत करुन, सभेच्या कामकाजास मा.प्रशासक यांच्या आदेशाने सुरुवात केली.

| | |
|---|---|
| **विषय क्र. ०१** | मागील स्थायी समिती प्रशासक सभा दि.०२/०९/२०२४ रोजीचे कार्यवृत्त वाचून कायम करणे. |
| **प्रशासक** | विषय मंजुर |
| **विषय क्र. ०२** | राष्ट्रीय नदी कृती योजना (NRAP) शेरीनाला व कवलापूर पंपींग स्टेशन येथे नव्याने ३०० व २०० अश्वशक्तीचे सबमर्सिबल पंप बसविणे अंदाजपत्रकीय र.रु.५९,५९,४३८/- मात्रचे कामी रितसर जाहिर निविदा मागविणेत आल्या होत्या. विहित मुदतीत प्राप्त निविदा मधील निविदाधारक सुवास इलेक्ट्रीकल,ठाणे यांचा दर एस्टीमेट दरापेक्षा १% कमी दर प्राप्त झालेने वाटाघाटीअंती त्यांनी १.५% कमी दराने कामगिरी करणेस सहमती दर्शविलेने निविदाधारक सुवास इलेक्ट्रीकल,ठाणे १.५% कमी दराने कामगिरी करुन घेणेस व त्याकामी येणारे र.रु.५८,७०,०४६/- मात्रचे खर्चास मान्यता देणे. |
| **प्रशासक** | विषय मंजुर. |
| **विषय क्र.०३** | जनरल फंडातून वेतन व अत्यावश्यक देयके अदा करणेकरीता मालमत्ता व अनामत या खाते अंतर्गत गुंतवणूक मुदतपूर्व मोडून सेव्हींग खातेवरती जमा करणेस त्याचप्रमाणे जनरल फंडातून गुंतवणूक मुदतपुर्व मोडून सेव्हींग खातेवरती जमा करणेस मान्यता देणे. |
| **प्रशासक** | विषय मंजूर |
| **विषय क्र.०४** | श्री गणेशोत्सव २०२४ मध्ये महानगरपालिका कार्यक्षेत्रात मनपाने स्थापन केलेल्या मुर्तीदान केंद्रावरील व कृत्रिम कुंडामधील विसर्जित केलेल्या गणेश मुर्ती सुरक्षित स्थळी लावणेकरीता रितसर जाहिर निविदा मागविणेत आल्या होत्या. विहित मुदतीत प्राप्त तीन निविदा मधील सर्वात कमी दराचे निविदाधारक श्री.मिथुन बसु गोगीकर,सांगली यांचेकडून प्राप्त प्रतिवाहन प्रतितास र.रु.१६२५/- प्रमाणे १८ बंदीस्त आयशर टेम्पो प्रतिवाहन ६ मन्युष्यबळासह भाडे तत्वावर घेऊन त्यांचेकडून कामगिरी करुन घेणेस व त्याकामी येणारे र.रु.३२,१७,५००/- मात्रचे खर्चास मान्यता देणे. |
| **प्रशासक** | विषय मंजूर |

| | |
|---|---|
| **विषय क्र.०५** | मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेतर्गत आयोजित महिला लाभार्थी मेळावा झालेल्या कार्यक्रमास (जेवण,भांडी, बैठक व्यवस्था,साऊंड,एल.ई.डी.स्क्रीन व माईक सिस्टीम,व्हिडीओ मिक्सर,व्हिडीओ मॉनिटर इ.) रितसर जाहिर निविदा प्रक्रिया राबविणेस पुरेसा कालावधी नसलेने व काम वेळेत पुर्ण होणेच्या दृष्टीने स्थानिक बाजारातून प्राप्त दरपत्रकातील सर्वात कमी दराचे विषयपत्रातील नमुद चार कामगिरी करीता प्राप्त पुरवठादाराकडून अत्यावश्यक व तातडीची बाब म्हणून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण ५ संविदा खंड २(२) चे परंतुकान्वये कामगिरी करुन घेणेत आलेल्या असून, त्यास व त्याकामी झालेल्या एकूण र.रु.६,७८,७००/- मात्रचे खर्चास मान्यता देणे. |
| **प्रशासक** | विषय मंजुर |
| **विषय क्र.०६** | सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका मुख्यालय व मंगलधाम कार्यालय,सांगली येथे दिव्यांगासाठी लिफ्ट बसविणे अंदाजपत्रकीय र.रु.४९,३३,०५२/- मात्रचे कामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण ५ संविदा खंड २ (१) अन्वये रितसर जाहिर निविदा www.mahatenders.gov.com या संकेत स्थळावर प्रसिद्ध करुन निविदा मागविणेस व त्याकामी येणारे खर्चास मान्यता देणे. |
| **प्रशासक** | विषय मंजुर |

येणेप्रमाणे सभेचे कामकाज सर्व उपस्थित अधिकारी यांच्या सहमतीने पुर्ण झाल्यानंतर मा.प्रशासक यांनी सभा संपलेचे जाहिर केले.

Both pages signed

**दिनांक :- ०९/०९/२०२४**

(शुभम गुप्ता भा.प्र.से.)
**प्रशासक तथा आयुक्त**
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

## स्थायी समिती प्रशासक सभा क्रमांक :- ०९/२०२४-२५

**स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक :-** ४८ **दिनांक :-** ०९/०९/२०२४

**विषय क्रमांक :-** ०१

---

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकारांन्वये,

मागील स्थायी समिती प्रशासक सभा दि.०२/०९/२०२४ रोजीच्या कार्यवृत्तातील ठराव क्र.४२ ते ठराव क्र.४७ हे वाचून दाखविण्यात आले. सदर कार्यवृत्त वाचून ही सभा सर्वानुमते कायम करीत आहे.

(शुभम गुप्ता भा.प्र.से.)
**प्रशासक तथा आयुक्त**
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

स्थायी समिती लिपिक

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

## स्थायी समिती प्रशासक सभा क्रमांक :- ०९/२०२४-२५

**स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक :-** ४९ **दिनांक :-** ०९/०९/२०२४

**विषय क्रमांक :-** ०२

---

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकारांन्वये,

सोबतचे अतिरिक्त आयुक्त (जलनि:सारण विभाग) यांचे दि.०४/०९/२०२४ रोजीचे विषयपत्र अवलोकनी घेणेत आले.

राष्ट्रीय नदी कृती योजना (NRAP) शेरीनाला व कवलापूर पंपींग स्टेशन येथे नव्याने ३०० व २०० अश्वशक्तीचे सबमर्सिबल पंप बसविणे अंदाजपत्रकीय र.रु.५९,५९,४३८/- मात्रचे कामी रितसर जाहिर निविदा मागविणेत आल्या होत्या. विहित मुदतीत प्राप्त निविदा मधील निविदाधारक सुवास इलेक्ट्रीकल,ठाणे यांचा दर एस्टीमेट दरापेक्षा १% कमी दर प्राप्त झालेने वाटाघाटीअंती त्यांनी १.५% कमी दराने कामगिरी करणेस सहमती दर्शविलेने निविदाधारक सुवास इलेक्ट्रीकल,ठाणे १.५% कमी दराने कामगिरी करुन घेणेस व त्याकामी येणारे र.रु.५८,७०,०४६/- मात्रचे खर्चास आणि सदर दराप्रमाणे ५%कन्टिन्जन्सी तरतुद खर्च र.रु.२,९३,५०२.३ व १८% GST र.रु.१०,५६,६०८.२८ प्रमाणे येणारे एकुण खर्च र.रु.७२,२०,१५७/- मात्रचे खर्चास विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

उक्त कामी येणारा खर्च विषयपत्रातील नमुद अर्थसंकल्पीय तरतुदी मधुन होणेचा आहे.

(शुभम गुप्ता भा.प्र.से.)
**प्रशासक तथा आयुक्त**
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

जलनिःसरण अभियंता

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

## स्थायी समिती प्रशासक सभा क्रमांक :- ०९/२०२४-२५

**स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक :- ५०** **दिनांक :- ०९/०९/२०२४**

**विषय क्रमांक :- ०३**

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकारांन्वये,

सोबतचे उपायुक्त (लेखा विभाग) यांचे दि.०६/०९/२०२४ रोजीचे विषयपत्र अवलोकनी घेणेत आले.

सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिकेस कर्मचारी वेतन व इतर अनुषंगीक खर्चाकरीता मा.शासनाकडुन वेळोवेळी एलबीटी पोटी अनुदान प्राप्त होत असते. परंतु माहे ऑगस्ट २०२४ करीता मा.शासनाकडुन मनपास कमी रक्कम प्राप्त झालेने मनपा कर्मचारी वेतन व अत्यावश्यक देयके अदा करणेसाठी महानगरपालिका मालमता व अनामत तसेच जनरल फंड या खाते अतंर्गत असलेले खालीलप्रमाणे मुदतपुर्व गुंतवणूक पावती मोडणे आवश्यक होते.

| अं.क्र | योजनेचे नांव | बँकेचे नांव | पावती क्रमांक | रक्कम रु. | गुंतवणूक मुदत संपत असलेली दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १. | मालमता | यस बॅक | ८७१४०४०००१३९७८ | ३२७९७०८२ | ०५-०९-२०२५ |
| २ | मालमता | फेडरल बॅक | १५०३०३००१८५४७७ | ५१०००६५ | ०७-०९-२०२५ |
| ३ | मालमता | फेडरल बॅक | १५०३०३००१८५४८५ | ५१०००६५ | ०७-०९-२०२५ |
| ४ | मालमता | फेडरल बॅक | १५०३०३००१८५४९३ | ५१०००६५ | ०७-०९-२०२५ |
| ५ | मालमता | फेडरल बॅक | १५०३०३००१८५५०१ | ५१०००६५ | ०७-०९-२०२५ |
| ६ | अनामत | फेडरल बॅक | १५०३०३००१८५७४१ | ३०००००० | १६-०९-२०२५ |

| अं.क्र | योजनेचे नांव | बँकेचे नांव | पावती क्रमांक | रक्कम रु. | गुंतवणूक मुदत संपत असलेली दिनांक |
|---|---|---|---|---|---|
| १. | जनरल फंड | कॅनरा बॅक | ०१२७२४३ | ५४६१२४७ | १९/०७/२०२५ |
| २ | जनरल फंड | कॅनरा बॅक | ०१२७२४४ | ५४६१२४७ | १९/०७/२०२५ |
| ३ | जनरल फंड | कॅनरा बॅक | ०१२७४४५ | ५४६१२४७ | १९/०७/२०२५ |
| ४ | जनरल फंड | कोटक महिंद्रा बॅक | ०४५०३२०३१४ | १०९८३३८८ | १४/०९/२०२५ |

सबब, महानगरपालिका कर्मचारी वेतन व अत्यावश्यक देयके अदा करणेसाठी वरील प्रमाणे गुंतवणूक मुदतपूर्व पावती ब्रेक केलेनंतर मालमत्ता खातेवरील रु ५.०० कोटी व अनामत या खाते वरील व्याजापोटी ३.९० कोटी पैकी रु ३.०० कोटी रुपये तसेच जनरल फंड खातेवरील र.रु.२,७३,६७,१२९/- मात्र मा.स्थायी समिती प्रशासन ठराव क्र.३४ दि.१४/०८/२०२४ च्या निर्णयानुसार महानगरपालिका कर्मचारी वेतन व अत्यावश्यक देयके अदा करणेसाठी वरील प्रमाणे गुंतवणूक पावती मुदतपूर्व मोडल्यानंतर महापालिका जनरल फंड या खातेवर वर्ग करणेस विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

(शुभम गुप्ता भा.प्र.से.)
**प्रशासक तथा आयुक्त**
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

मुख्य लेखा अधिकारी

**महापालिका सचिव**
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

## स्थायी समिती प्रशासक सभा क्रमांक :- ०९/२०२४-२५

**स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक :- ५१** **दिनांक :- ०९/०९/२०२४**

**विषय क्रमांक :- ०४**

---

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकारांन्वये,

सोबतचे उपायुक्त मुख्यालय (आरोग्य विभाग) यांचे दि.०९/०९/२०२४ रोजीचे विषयपत्र अवलोकनी घेणेत आले.

महानगरपालिका क्षेत्रामध्ये सन २०२४ च्या श्री गणेशोत्सव काळामध्ये महानगरपालिकेने प्रभाग समिती क्रं. १,२,३ व ४ मध्ये एकूण २९ ठिकाणी मुर्तीदान केंद्रे तसेच मुर्ती विसर्जनाकरीता कृत्रिम कुंडाची स्थापना करण्यात आलेली आहे. यासाठी श्री गणेशोत्सव २०२४ मध्ये महानगरपालिका कार्यक्षेत्रात मनपाने स्थापन केलेल्या मुर्तीदान केंद्रावरील व कृत्रिम कुंडामधील विसर्जित केलेल्या गणेश मुर्ती सुरक्षित स्थळी लविण्याकरीता आयशर टॅम्पो मनुष्यबळासह भाडेत्त्वावर पुरवून कामगिरी करून घेणेकरिता रितसर जाहिर निविदा मागविणेत आल्या होत्या. विहित मुदतीत प्राप्त तीन निविदा मधील सर्वात कमी दराचे निविदाधारक श्री.मिथुन बसू गोगीकर,सांगली यांचा बंदीस्त आयशर टॅम्पो प्रतिवाहन ६ मनुष्यबळासह भाडे तत्वावर पुरवून कामगिरी करण्याकरीता प्रति तासाकरीता सर्वात कमी सर्वकरासहित र.रु.१६२५/- मात्र इतका दर प्राप्त झालेला आहे. त्याप्रमाणे १ वाहन ६ मनुष्यबळासह (र.रु.१६२५/- x ११ तास x १० दिवस) करीता र.रु.१,७८,७५०/- प्रमाणे १८ बंदिस्त आयशर टॅम्पो मनुष्यबळासह याप्रमाणे र.रु.३२,१७,५००/- इतका खर्च अपेक्षित आहे.

त्यानुसार प्रभाग समिती क्रं.१,२,३ व ४ चे कार्यक्षेत्रातील मुर्तीदान केंद्र व मुर्ती विसर्जन करीता स्थापन करण्यात आलेल्या कृत्रिम कुंडामधील विसर्जित केलेल्या गणेश मुर्ती सुरक्षित स्थळी हलविण्याकरीता सर्वात कमी दराचे निविदाधारक श्री.मिथुन बसू गोगीकर,सांगली यांचेकडून प्रतिवाहन प्रतितास र.रु.१६२५/- प्रमाणे १८ बंदीस्त आयशर टॅम्पो प्रतिवाहन ६ मनुष्यबळासह भाडेतत्वावर घेणेस व त्याकामी येणारे र.रु.३२,१७,५००/- मात्रचे खर्चास विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

सदरचा खर्च सन २०२४-२५ या आर्थिक वर्षात मंजूर ई-०२८२ घनकचरा व्यवस्थापन व अभिकर्ता शुल्क यालेखाशिर्षातून होणेचा आहे.

(शुभम गुप्ता भा.प्र.से.)
**प्रशासक तथा आयुक्त**
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

वैद्यकिय आरोग्याधिकारी

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

## स्थायी समिती प्रशासक सभा क्रमांक :- ०९/२०२४-२५

**स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक :-** ५२ **दिनांक :-** ०९/०९/२०२४

**विषय क्रमांक :-** ०५

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकारांन्वये,

सोबतचे अतिरिक्त आयुक्त (म.बा.वि. विभाग) यांचे दि.०९/०९/२०२४ रोजीचे विषयपत्र अवलोकनी घेणेत आले.

राज्यातील महिलांच्या आर्थिक स्वातंत्र्यासाठी आणि त्यांच्या आरोग्य आणि पोषणात सुधारणा करण्यासाठी आणि कुटुंबातील त्यांची निर्णायक भूमिका मजबूत करण्यासाठी महाराष्ट्र राज्यात "मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना" सुरु करण्यात आलेली आहे. त्यानुषंगाने मा.पालकमंत्री महोदय यांचे अध्यक्षतेखाली दि.१७/०८/२०२४ रोजी मिरज बालगंधर्व नाट्यगृह, मिरज येथे "मुख्यमंत्री माझी लाडकी बहीण योजना" महिला लाभार्थी मेळावा कार्यक्रम आयोजित करणेत आला होता.

सदर कार्यक्रमाच्या अनुषंगाने दि.१५/०८/२०२४ रोजी मा.जिल्हाधिकारीसो, सांगली यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीमध्ये दिलेल्या सूचनेनुसार महानगरपालिकेकडे खालील कामगिरी करणेबाबत सूचना प्राप्त झालेल्या आहेत. त्यानुसार सदर कार्यक्रमाचा खर्च महानगरपालिका व जिल्हापरिषद यांनी समप्रमाणात विभागून त्यांच्याकडील असलेल्या निधीमधून वाजवी प्रक्रिया राबवून करावयाचा असलेने व सदरचा कार्यक्रम दि.१७/०८/२०२४ रोजी असल्याने व त्यामध्ये निविदा प्रक्रिया पार पाडणे अडचणीचे असलेने याकामी संदर्भ क्र. ५ अन्वये कोटेशन दर मागवून त्याच्या होणारे अंदाजपत्रकीय रक्कम रु.६,००,०००/- मात्रचे व वाढीव होणारे खर्चास आयुक्तसो यांची मान्यता घेणेत आलेली आहे. सदर कामगिरीचा खर्च सन २०२४-२५ च्या मंजूर अर्थसंकल्पातील महिला व बाल विकास विभागाकडील (ई-०७७९) ५ % जेंडर बजेट रक्कम रु.४,५०,००,०००/- मात्र तरतूदीमधुन या लेखाशिर्षामधुन होणेचा आहे व त्यानंतर सदर कार्यक्रमास झालेल्या एकूण खर्चापैकी ५० % रक्कम जिल्हापरिषद, सांगली यांच्या कार्यालयाकडून प्राप्त होणार आहे.

उपरोक्त कालावधी विचारात घेता, मुख्यमंत्री माझी लाडकी बहिण योजनेंतर्गत आयोजित महिला लाभार्थी मेळावा झालेल्या कार्यक्रमास (जेवण,भांडी, बैठक व्यवस्था,साऊंड,एल.ई.डी,स्क्रीन व माईक सिस्टीम,व्हिडीओ मिक्सर,व्हिडीओ मॉनिटर इ.) रितसर जाहिर निविदा प्रक्रिया राबविणेस पुरेसा कालावधी नसलेने व काम वेळेत पुर्ण होणेच्या दृष्टीने स्थानिक बाजारातून प्राप्त दरपत्रकातील सर्वात कमी दराचे खालील नमुद चार कामगिरी करीता कोटेशन प्राप्त झालेले आहेत.

| अ.क्र. | तपशिल | पुरवठा धारकाचे नाव | सर्वात कमी दर |
|---|---|---|---|
| १. | मंडप व्यवस्था | किशोर महादेव खराडे | २,३३,८००/- |
| २. | टेबल खुर्च्या,ताट-वाटी व्यवस्था | धनंजय आकाराम रुपनर | १५,०००/- |
| ३. | भोजन - शाकाहारी (१२३० X ३२०/- प्रति ताट) | पावर्ती मागासवर्गीय महिला बचत गट, सांगली | ३,९३,६००/- |
| ४. | लाईट व साऊंड सिस्टीम व्यवस्था | शार्प व्हिजन | ४९,८००/- |
| | | **एकूण र.रु.** | **६,७८,७००/-** |

उपरोक्त प्रमाणे प्राप्त कोटेशननुसार सर्वात कमी दराचे पुरवठादार यांचेकडून अत्यावश्यक व तातडीची बाब म्हणून महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण ५ संविदा खंड २(२) चे परंतुकान्वये उपरोक्त प्रमाणे कामगिरी करुन घेणेत आलेल्या असून, त्यास व त्याकामी झालेल्या र.रु.६,००,०००/- व वाढीव र.रु.७८,७००/- मात्र असे एकूण र.रु.६,७८,७००/- मात्र या खर्च रक्कमेतील ५०% खर्चास ही सभा कार्योत्तर मान्यता देत आहे.

उक्त कामी येणारा खर्च विषयपत्रातील नमुद अर्थसंकल्पीय तरतुदी मधून होणेचा आहे.

अतिरिक्त आयुक्त

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका

(सुधम गुप्ता भा.प्र.से.)
**प्रशासक तथा आयुक्त**
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

# सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

## स्थायी समिती प्रशासक सभा क्रमांक :- ०९/२०२४-२५

**स्थायी समिती प्रशासक ठराव क्रमांक :-** ५३ **दिनांक :-** ०९/०९/२०२४

**विषय क्रमांक :-** ०६

महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील तरतुदी व विशेषत: कलम ४५२ अ मधील तरतुदीनुसार महाराष्ट्र शासन नगरविकास विभागाकडील दि.२४/०८/२०२३ रोजीचे आदेशान्वये प्रशासक म्हणून प्राप्त अधिकारानुसार मा.स्थायी समितीच्या अधिकारांन्वये,

सोबतचे अतिरिक्त आयुक्त (विद्युत विभाग) यांचे दि.०६/०९/२०२४ रोजीचे विषयपत्र अवलोकनी घेणेत आले.

सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका मुख्यालय व मंगलधाम कार्यालय,सांगली येथे दिव्यांगासाठी लिफ्ट बसविणे अंदाजपत्रकीय र.रु.४९,३३,०५२/- मात्रचे कामी महाराष्ट्र महानगरपालिका अधिनियमातील प्रकरण ५ संविदा खंड २ (१) अन्वये रितसर जाहिर निविदा www.mahatenders.gov.com या संकेत स्थळावर प्रसिद्ध करुन निविदा मागविणेस व त्याकामी येणारे खर्चास विषयपत्रातील शिफारशीनुसार ही सभा मान्यता देत आहे.

उक्त कामी येणारा खर्च विषयपत्रातील नमुद केलेल्या अर्थसंकल्पीय तरतुदीच्या मागील अखर्चित निधी मधून होणेचा आहे.

(शुभम गुप्ता भा.प्र.से.)
**प्रशासक तथा आयुक्त**
सांगली मिरज आणि कुपवाड शहर महानगरपालिका

विद्युत अभियंता

महापालिका सचिव
सांगली मिरज कुपवाड शहर महानगरपालिका